प्रेसनोट

दि.२७/११/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | अकोले पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३०१८/२०१० |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | दौलत नामदेव डामरे, परिरक्षण भुमापक, वर्ग–३, तत्कालीन नेमणुक उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ६०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ६०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, आरोपी लोकसेवक दौलत नामदेव डामरे, परिरक्षण भुमापक, वर्ग–३, तत्कालीन नेमणुक उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अकोले यांनी तक्रारदार यांचे जमीनीचे हद्द कायम मोजणीचे कागदपत्रे तहसिल कार्यालयात पाठविणेकरीता तक्रारदार यांच्याकडे दि.२९/१०/२०१० रोजी पंचासमक्ष ६,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले होते. त्यांच्याविरुध्द अकोले पो.स्टे., जि.अहमदनगर येथे दि.२९/१०/२०१० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदर सापळा कारवाई विजय धोपावकर, तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांनी केली होती व त्यांनी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, संगमनेर येथे नमुद आरोपीविरुध्द दि.११/३/२०११ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br>सदर खटल्याची सुनावणी मा.श्री.डी.एस.घुमरे, विशेष अतिरिक्त सत्र न्यायाधीश, संगमनेर यांचे समोर होऊन पोलीसांनी केलेला चांगला तपास व महत्वाच्या साक्षीच्या आधारे मा.न्यायालयाने आरोपी लोकसेवक दौलत नामदेव डामरे यांना आज दि.२७/११/२०१९ रोजी १)ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ३ वर्ष साधे कारावासाची शिक्षा व १२,०००/– रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद २)ला.प्र.का.सन १९८८ चे कलम १३(२) प्रमाणे ४ वर्ष साधे कारावासाची शिक्षा व १२,०००/– रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.<br>सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे ॲड.बी.जी.कोल्हे, सहायक सरकारी अभियोक्ता, संगमनेर यांनी काम पाहिले असून त्यांना पोहेकॉ.सतिष जोशी यांनी मदत केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

27.11

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner